प्रेस नोट ता. २०/०५/२०१९

**व्यापाऱ्यांना खंडणी मागुन अपहरण करणाऱ्या खंडणीखोर फरारी आरोपीस हडपसर पोलीसांकडून अटक**

पुणे शहरातील गंभीर गुन्हयांना प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत विशेष मोहिम राबविण्यात येत होती.

हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. १५४/२०१९ भादविक ३६४(अ), ३८६, ३२३, ५०४, ५०६, ३४ मधील फिर्यादी लालाराम घिसाराम चौधरी यांना दिनांक ०९/०२/२०१९ रोजी अंदाजे रात्री २०.३० वाजण्याचे सुमारास कचरा डेपोच्या बाजुला, मंतरवाडी फाटा जवळ, कात्रज बाय रोड लगत फुरसुंगी पुणे येथे आरोपी नामे मयुर उत्तम मोडक वय २८ वर्षे रा. खोकेनगर, वडकीगाव ता. हवेली, जि. पुणे व गणेश मोडक रा. वडकी गाव ता. हवेली, जि. पुणे यांनी आपआपसात संगणमत करुन यातील फिर्यादी लालाराम घिसाराम चौधरी हे त्यांचे किराणा दुकानात असताना आरोपी गणेश मोडक व मयुर मोडक यांनी फिर्यादीस दुकानाच्या बाहेर बोलावुन कचरा डेपोच्या पलीकडे, मंतरवाडी फाटा जवळ, फुरसुंगी, पुणे येथे त्यांचे लाल रंगाच्या स्विफ्ट गाडीमध्ये डांबुन ठेवुन, पिस्टलची भिती दाखवुन गणेश व मयुर यांनी फिर्यादीस मादरचोद तु दुसऱ्या दुकानदारांसोबत तक्रार देण्यासाठी लोणी काळभोर या ठिकाणी का आला होतास असे म्हणुन शिवीगाळ करुन, हाताने मारहाण करुन, फिर्यादीस किराणा दुकान चालवायचे असल्यास आम्हाला प्रत्येक महिन्याला पन्नास हजार रुपये खंडणीची दयावी लागले असे म्हणताच फिर्यादीने हप्ता देण्यास नकार दिला असता पाहिजे आरोपी गणेश मोडक याने त्याचेकडील धारधार हत्याराने उलटे करुन डोक्यावर, हातावर, पाठीवर मारहाण केले व अटक आरोपी मयुर मोडक याने फिर्यादीच्या तोंडावर व शरीरावर पाण्यासारखा पदार्थ टाकले. त्यानंतर आरोपी गणेश मोडक व मयुर मोडक यांनी फिर्यादी प्रत्येक महिन्याला पन्नास हजार रुपयाची खंडणी नाही दिली तर जीवे ठार मारुन टाकेन अशी धमकी देवुन निघुन गेले.

यातील आरोपी मयुर मोडक हा नमूद गुन्हयात अटक असुन तो सध्या जेलमध्ये आहे. दाखल गुन्हयातील फरारी आरोपी नामे गणेश दिलीप मोडक हा रेकॉर्डवरील आरोपी असुन याचेविरुध्दात लोणीकाळभोर पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल आहेत. गणेश दिलीप मोडक वय २४ वर्षे वडकी नाला, दहावामैल, वडकीगाव ता. हवेली, जि. पुणे हा गुन्हा केल्यापासुन पोलीसास चकमा देवुन फरार होता. फरार असताना त्याने लोणी काळभोर पोलीस स्टेशनच्या हददीत व्यापाऱ्यांना धमकावणे चालु ठेवले. दिनांक १८/०५/२०१९ रोजी दुपारी हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीतील मंतरवाडी फाटा येथील किराणा दुकान मालक आमराराम मुलाराम घांची यांना जबरदस्तीने अपहरण करुन स्वीफट गाडीमध्ये डांबुन ठेवुन एक लाख रुपयेची खंडणी मागितल्याने त्याचेविरोधात हडपसर पोलीस स्टेशन येथे गुरनं ४३१ /२०१९ भादविक ३६४(अ), ३८६, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

. त्यानंतर मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांनी लागलीच सपोनि चव्हाण, पो. ना. राजु वेगरे, पो. ना. गणेश दळवी, पो. ना. सैदोबा भोजराव, पो. ना. विनोद शिवले, पो. शि. अकबर शेख, पो. शि. गोविंद चिवळे यांची टिम तयार करुन खंडणी मागणाऱ्या आरोपीच्या शोधण्याकरीता रवाना केले. त्यांनतर सपोनि चव्हाण व त्यांच्या टिम ने लोणी काळभोर, फुरसुंगी, देवाची ऊरुळी, वडकी या परिसरात शोध घेतला असताना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, गणेश मोडक हा त्याचे राहते घरात असुन त्याने त्या रुमला बाहेर कुलुप लावलेले आहे अशी बातमी प्राप्त झाल्याने लागलीच सपोनि चव्हाण यांनी फुरसुंगी बिट मार्शल यांना बोलावुन गणेश मोडक याचे घराची पाहणी केली असता तो मिळून आल्याने त्यास पकडून हडपसर पोलीस स्टेशन पुणे येथे आणुन १५४/२०१९ भादविक ३६४(अ), ३८६, ३२३, ५०४, ५०६, ३४ अटक करुन त्याची पोलीस कस्टडीची रिमांड घेवुन स.पो.नि. चव्हाण हे गुन्हयाचा अधिक तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा.पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक किरण लोंढे, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो.ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो.ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. ना.१४१० नानासाहेब पतुरे, पो.शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो.शि. ७६८४ शंशिकांत नाळे, पो. शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते, पो. शि. १२४५ वैभव भोसले, पो. शि. ७३०२ सुनिल कांबळे पो. शि. १००४० प्रविण ढोण अमित कांबळे यांनी केली आहे.